फोन नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,
principal.gcoekarad@dtemaharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

विद्यानगर, कराड पिन - 415124 जि. सातारा

जा.क्रं.शाअमक/विवि/शिष्यवृत्ती/२०२०-२१/2806 दिनांक – 3 SEP 2021

## सूचना अत्यंत महत्वाची

**विषय** — SC,ST,VJNT,OBC,SBC (Scholarship/Freeship) या प्रवर्गातील विदयार्थ्यांना डिबीटी पोर्टलवर अर्ज भरणेबाबत ----

**संदर्भ** :- www.mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावरील डॅशबोर्ड वरील सुचना.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने शैक्षणीक वर्ष २०२०-२१ मधील सर्व पात्र प्रवेशीत SC,ST,VJNT,OBC,SBC (Scholarship/Freeship) प्रवर्गातील विद्यार्थांना कळविण्यात येते की, शिष्यवृत्ती व निर्वाह भत्ता प्रतीपुर्ती योजनेचे अर्ज www.mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर अचुक रित्या परिपुर्ण भरुन विद्यार्थाने स्वतःच्या लॉगीन मधुन अर्ज कन्फर्म करून घ्यावेत व **नियमीत शैक्षणीक सत्र सुरू होताच** मुळ अर्ज स्वतःच्या स्वाक्षरी सह व त्या बाबतची आवश्यक असणारी महाडीबीडी या वेब पोरटरवरती अपलोड करण्यात आलेल्या कागद पत्रांची झेरॉक्स प्रत (विद्यार्थी विभागात) सादर करावीत.

(टिप:- अधिक माहिती साठी विद्यार्थ्यानी www.mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळाचा वापर करावा व ते **तसेच अंतीम तारीख :- www.mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावरील डॅशबोर्ड नुसार शैक्षणीक वर्ष २०१९-२० करीता दि.१५/०९/२०२१ व शैक्षणीक वर्ष २०२०-२१ करीता दि.३०/०९/२०२१ अशी आहे याची नोंद घ्यावी**, सदरच्या संकेत स्थळावरील नेहमी डॅश बोर्ड पाहण्यात यावा व नुतनिकरणा संदर्भात पात्र विद्यार्थ्यांनी आपला अर्ज स्वतः च्या प्रोफाईलमध्ये अपडेट करुन अर्ज नुतनीकरणाची प्रक्रीया पार पाडावयाची आहे)

शिष्यवृत्ती बँकेच्या खात्यात जमा होण्यासाठी आपल्या खात्याला आधार सीड असणे गरजेचे आहे. तरी काही विद्यार्थ्यांना बँक खात्यात आधार सीड नसल्यामुळे पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती जमा होण्यास व्यत्यय येत आहे. असे विद्यार्थी जवळच्या पोस्ट ऑफिसला भेट देऊन 'इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे' आधार सीड असलेले खाते उघडण्याचा लाभ घेऊ शकतात. खाते उघडण्यासाठी पुढील बाबींची आवशकता आहे.१ मोबाईल क्रमांक.२ आधार क्रमांक. ३ पॅनकार्ड (उपलब्ध असेल तर).४ शिष्यवृत्ती ॲप्लिकेशन क्रमांक.'इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे' खाते साधारण बचत खाते असल्याने ते उघडणायची सुविधा विद्यार्थ्यांकरीता उपलबध आहे. हे खाते तात्काळ उघडले जाते आणि त्यासाठी कुठल्याही कागदपत्राची गरज भासत नाही. तरी सर्वानी ह्या संधीचा फायदा घ्यावा. तसेच विहीत मुदतीत अर्ज सादर न केल्यास व सदरच्या सवलतीपासून वंचित राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी विदयार्थ्याची राहील याची विदयार्थ्यानी नोंद घ्यावी. अशा विदयार्थ्यांकडून महाविदयालयाची फी वसूल करण्यात येईल.तसेच शिष्यवृत्ती करीता पात्रतेबाबत डीबीटी पोर्टल वरुन डाऊनलोड करुन घेतलेली कागदपत्रांची प्रवर्ग निहाय यादी सोबत जोडण्यात येत आहे ती पाहण्यात यावी.

Govt. College of Engineering Karad ★ Dist. Satara 415124 ★ सत्यमेव जयते

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,कराड

प्रत – १.सर्व सूचना फलकांवर लावणेसाठी.
२. संस्थेच्या संकेत स्थळावरती (अपलोड करण्यासाठी)